# प्रगत अध्ययन संस्थेच्या विद्यार्थ्यांची दत्ताजी साळवी उद्यान भेट

विद्या प्रसारक मंडळाच्या प्रगत अध्ययन संस्थेतर्फे चालवण्यात येणा-या लँडस्केप व गार्डनींगच्या या विषयाकरता विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या बगीच्यांना भेटी देण्याकरता नेले जाते. ७ डिसेंबर २०१९ रोजी या विद्यार्थ्यांनी ठाण्यातील साळवी उद्यानाची मजा अनुभवली. या उद्यानाला खरतर ठाण्यातील नंदनवनच म्हणावे लागेल. विद्यार्थ्यांबरोबर मार्गदर्शक होत्या डॉ.सौ.मंगला बोरकर व डॉ.सौ.अलका भागवत **आम्हा ठाणेकरांना अभिमान वाटावा अशी विरंगुळ्याची ,अभ्यासाची , निवांतपणाची ,आनंददेणारी , दृष्टीला सुखावणारी , निःशुल्क जागा म्हणजे दत्ताजी साळवी उद्यान होय . ४,६०० चौरस मीटर वर हा उद्यानाचा हिरवागार गालिचा पसरला आहे. ठाणे महानगरपालिका व वनखाते यांच्या संयुक्त विद्यमाने हे उद्यान जन्मास आले. २५ डिसेंबर २०११ ह्या दिवशी ठाणे महानगरपालिके तील मान्यवर लोकांच्या हस्ते ह्या उद्यानाचे उदघाटन झाले. उद्यानाच्या प्रवेश द्वारापासूनच ह्या चित्र नगरीस सुरवात होते. प्रवेशद्वाराच्या कमानीवर वेली चढवलेल्या आहेत. वनस्पती शास्त्राच्या अभ्यासक्रमात जसे शिकावयाचे आहे तशीच सर्व वनस्पती येथे पाहायला मिळते. हर तऱ्हेची वनस्पती लावण्याचा कटाक्ष येथे घेतलेला दिसतो. लहान मृदू रोपे ,झुडुपे, लहान वृक्ष, मोठे वृक्ष ,लहान मोठ्या दूरवर पसरणाऱ्या वेली . त्या शिवाय जमिनीवर गालिच्या सारख्या सरपटणाऱ्या वनस्पतीही इथली शोभा वाढवतात. सर्व काही खूपच सुंदर . येथील बरीचशी वनस्पती भारतातील आहे उदाहरणार्थ असाणा , आवळा ,उंडी,रुद्राक्ष तसेच मध्य व दक्षिण अमेरिकेतील वृक्ष ही येथे आहेत शेंदरी , फकिराचा कमंडलू ,कोको , बदक वेल ,वेगवेगळ्या रंगाची कृष्ण कमळे ह्या सारख्या वेली आणि असे अनेक वृक्ष येथे आहेत .**

**शिवाय बागेची रीतसर आखणी सुद्धा केलेली दिसून येते . एका भागात सर्व पाम कुळातील वृक्ष आहेत. चिनी फॅन पाम ,ताड, माड ,सुपारी,शिंदी इत्यादी. तसेच साइकडेंसी कुळातील कडक पानांचा झामिया सुद्धा आहे. त्याच्यागवत पानांची रचना आकर्षक आहे. पाम्स च्या बाजूला वेगवेगळ्या बाबूंचा विभाग आहे .त्याच प्रमाणे दुर्मिळ असे वांगी वृक्ष ,अर्जून ,करमळ ,कांचन ,आपटा , मुचकुंद ,निलगिरी ,रतन गुंज हे आणि असे आणिक वेग वेगळे वृक्ष .सर्पगंधा सारखी औषधी वनस्पती आहे. वड , पिंपळ या सारखे फायकस कुळातील अनेक वृक्ष आहेत. त्या शिवाय या उद्यानात दोन लहान तळी आहेत . ज्यात पाण्यातली वनस्पती आहे . निळी, गुलाबी, लाल कमळे,सायपेरस ,जल कुंभी** (Pistia ,Eichhornia ) **आहेत. आसामात मिळणारे झाडूचे गवत येथे पाहावयास मिळते . एकंदरीत काय तर येथे आपल्याला स्थानिक तसेच विदेशी** (exotic ) **वनस्पतींचे दर्शन घडते.फुलपाखरांना आकर्षित करणारी फुलझाडे सुद्धा पाहावयास मिळतात . ह्यावर अनेक विविध रंगी फुलपाखरे भेट देण्यास येतात. शिवाय सूर्य पक्षी, बुलबुल ,तांबट यासारखे अनेक पक्षीही येथे येतात. जैव विविधतेने परिपूर्ण अश्या या उद्यानाची निगाही चांगली राखली जाते. वेगवेगळ्या ऋतु मध्ये फुलणारी फुले पाहताना वेगळीच मजा येते.**



